# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.९/२०२३** **दिनांक ३०/०५/२०२३**
**स्थळ- जिल्हा न्यायालय, अहमदनगर** **वेळ- सायं.४.०० वा.**

मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथील जनहित याचिका नं.९८/२०२१ व (सी.ए. नं.११९७३/२०२१) यावर दि.१३/०९/२०२२ रोजी मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीकरीता नियुक्त केलेल्या तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा मंगळवार दि.३०/०५/२०२३ रोजी सायं.४.०० वा. जिल्हा न्यायालय, अहमदनगर येथे आयोजित करणेत आली असलेबाबत जा.नं.एसएसएस/वशी-०४/८११/२०२३, दि.२७ मे,२०२३ अन्वये सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आलेले होते.

त्यानुसार मा.तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा मंगळवार दि.३०/०५/२०२३ रोजी सायं.४.०० वा. जिल्हा न्यायालय, अहमदनगर येथे मा.श्री.सुधाकर यार्लगड्डा, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

**या सभेस खालील मा.सदस्य उपस्थित होते.**

**मा.श्री.सुधाकर यार्लगड्डा,**
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा**
**अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

**मा.श्री. सिध्दाराम सालीमठ, भा.प्र.से.**
**जिल्हाधिकारी, अहमदनगर तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

**मा.श्री.राहूल जाधव,**
**प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

---

**विषय नं.१ दि.१६.०५.२०२३ रोजी शिर्डी येथे झालेल्या तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.३७५ दि.१६.०५.२०२३ रोजीचे सभेतील विषय नं.४७, निर्णय क्र.३६० बाबत सदर प्रस्तावाचे सादरीकरण करतेवेळी माहिती देतेवेळी मेडीकल डायरेक्टर उपस्थित नव्हते. त्यांनी १० टक्के दरवाढ सरसकट करण्यामध्ये काही नगण्य गोष्टी व काही महत्वाच्या गोष्टी उपरोक्त प्रस्तावात नजरेस आणून देणे राहून गेल्याने त्यामुळे उपरोक्त प्रस्तावाचे स्पष्टीकरण पुढील आदेशापावेतो स्थगीत करण्यात येत आहे. मेडीकल डायरेक्टर यांना जे सुचवावयाचे आहे तसा प्रस्ताव रितसर तदर्थ समितीसमोर सादर करण्याचे आदेश देण्यात येत आहे.**

**दि.१६.०५.२०२३ रोजी शिर्डी येथे झालेल्या तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.**

**(कार्यवाही-सभाकामकाज विभाग)**

---

**विषय नं.२ चक्रीय पध्दतीने मान्यता दिलेले विषय वाचून कायम करणे.**

1. **शिर्डी येथे ०१ जुलै ते ०३ जुलै २०२३ या कालावधीत श्री शिवकृपानंद स्वामी फाऊंडेशन यांचे गुरुपौर्णिमा उत्सवाचे आयोजनाचे परवानगीबाबत.**

**निर्णय क्र.३७६/१ चक्रीय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

2. **श्री गुरुपौर्णिमा उत्सव-२०२३ मधील श्रींच्या फोटो व पोथीच्या मिरवणूकीत वीणा, पोथी, फोटो तसेच पाद्यपुजा, रुद्राभिषेक इत्यादी कार्यक्रमासाठी मान्यवरांची नावे निश्चित होणेबाबत.**

**निर्णय क्र.३७६/२चक्रीय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

3. **पुजारी व सहाय्यक पुजारी भरती प्रक्रियेबाबत.**

**निर्णय क्र.३७६/३ चक्रीय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

4. **संस्थान कंत्राटी कामगारांना संस्थान सेवेत नियमित नेमणूका देणेबाबत.**

**निर्णय क्र.३७६/४ चक्रीय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

5. **वैद्यकीय संचालक या पदाचा ११ महिने कंत्राटी पध्दतीचा कार्यकाळ संपलेला असल याने पुन्हा नेमणूक आदेश मिळणेबाबत डॉ.शैलेश कार्तिक ओक यांचे विनंती अर्जाबाबत.**

**निर्णय क्र.३७६/५चक्रीय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.३ सन २०२३-२०२४ करीता वार्षिक स्वच्छता साहित्य खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.३७७ प्रस्ताव मंजूर. रु.५० लाखाचे आत खर्च असल्याने व GEM Portal व्दारे खरेदी करण्याचा प्रस्ताव असल्याने सी. ए. दाखल करण्याची आवश्यकता नाही.**

**(कार्यवाही-आरोग्य विभाग)**

---

**विषय नं.४ संस्थानतर्फे प्रचलित पध्दतीने सन २०२४ करीता श्री साई दैनंदिनी व विविध प्रकारच्या दिनदिर्शिका प्रकाशित करणेस व साईभक्तांना विक्रीसाठी उपलब्ध करुन देणेसाठी येणा-या छपाई खर्चास व ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३७८ काही लोकांना मेल पाठवून दरपत्रके मागवून सरासरी 20 टक्के दरवाढ गृहीत धरुन प्रस्ताव सादर केला आहे. संस्थानचे वेबसाईटवर प्रसिध्दी देऊन जास्तीत जास्त मुद्रकांकडून दर मागविणेत यावेत व पुन्हा प्रस्ताव सादर करावा.**

**(कार्यवाही-प्रकाशने विभाग)**

---

**विषय नं.५ संस्थान व रुग्णालये विभागाकडील मालमत्ता विमा, कामगार कायदा १९२३ अन्वये कर्मचारी विमा व श्री साइभक्तांचा अपघाती विमा पॉलीसीचे नुतनीकरणासाठी राष्ट्रीयकृत विमा कंपन्याकडून बंद पाकिटामध्ये दरपत्रक मागविणे व याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३७९ प्रस्तावातील पान नं.५७ वर तदर्थ समितीचे दि.२१.०५.२०२२ चे सभेतील निर्णय क्र.२९६ चा उल्लेख केलेला आहे. परंतु सदरहु तारखेस तदर्थ समिती नव्हती. त्यामुळे तदर्थ समिती ऐवजी व्यवस्थापन समिती अशी दुरुस्ती करण्यात येत आहे.**

**प्रस्ताव मंजूर. सी.ए. दाखल करावा. (कार्यवाही-लेखाशाखा/विधी विभाग)**

---

विषय नं.६ सन २०२३-२४ करीता साईबाबा भक्तनिवासस्थान, साईप्रसाद निवासस्थान व व्दारावती भक्तनिवास या विभागाकडील इमारतीमध्ये पेस्ट कंन्ट्रोल (किटक नाशक औषध फवारणी) करणेकामी निम्नतम दरधारकास कार्यादेश देणेबाबत.

निर्णय क्र.३८० प्रस्तावातील पान नं.६५ वर दि.२३.०५.२०२२ असा उल्लेख आहे. त्याऐवजी दि.२३.०५.२०२३ असे वाचण्यात यावे. प्रस्ताव मंजूर.

(कार्यवाही-साईबाबा भक्तनिवासस्थान)

---

विषय नं.७ साई धर्मशाळा विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबीग, स्वच्छता इ.दुरुस्ती व देखभालीची कामे सध्या कार्यरत आऊटसोर्स ठेकेदाराकडून आहे त्याच मंजूर दरात करुन घेणेकामी मुदतवाढ कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.३८१ तदर्थ समितीचे दि.१६.०५.२०२३ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३३९ नुसार पुर्वीचेच दराने मुदतवाढीची मागणी केलेली असल्याने मुदतवाढीचे प्रस्तावास मान्यता दिली.

(कार्यवाही-साई धर्मशाळा)

---

विषय नं.८ दरपत्रकाव्दारे तातडीने खरेदी केलेले टोन्ड गाय दुधाचे पुरवठादार मे.गोदावरी खोरे ना.प.पा.ता.सह.दुध उत्पा.संघ लि.कोपरगाव व मे.श्री स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तिसगाव यांना पुर्नर्प्रत्ययी पुरवठा आदेश देणेस व येणारे खर्चास मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.३८२ विहीत निविदा प्रक्रिया पुर्ण होणे बाकी असल्याने व पुर्वीचेच करारानुसार पुर्वीचेच दराने मुदतवाढीचा प्रस्ताव असल्याने प्रस्तावाला व खर्चास मान्यता दिली.

(कार्यवाही-खरेदी विभाग)

---

विषय नं.९ गणवेश पुरवठादार मे.चंपालाल अॅन्ड कंपनी, नाशिक यांचे दि.०९.०२.२०२३ रोजीचे पत्राने गणवेश पुरवठा सुरु करणेसाठी परवानगी मिळणेचे पत्राबाबत.

निर्णय क्र.३८३ सदर प्रस्तावाचे बाबतीत टेंडर प्रक्रिया यापुर्वीच रद्द झालेली आहे. तशी माहिती सदर पुरवठादार यांना देण्यात यावी.

(कार्यवाही-खरेदी विभाग)

---

विषय नं.१० शैक्षणिक वर्ष २०२१-२२ व शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ मधील विधवा महिला पाल्य मोफत शिक्षण योजना, लाभार्थी विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण देणेस व याकामी येणा-या एकुण खर्चास मान्यता मिळणेबाबत.

**निर्णय क्र.३८४** प्रस्ताव मंजूर. (कार्यवाही-श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल)

---

**विषय नं.११** शैक्षणिक वर्ष २०२३-२४ साठी आवश्यक शिक्षक आऊटसोर्स पध्दतीने पद भरतीबाबत.

**निर्णय क्र.३८५** मागील वर्षी ११ महिने कालावधीकरीता तात्पुरत्या स्वरुपात नेमणूक करण्यात आलेल्या शिक्षकांना प्रतिमहा रु.१८,०००/- एकत्रित मानधन दिले जाते. आता बाहयस्त्रोत ठेकेदारामार्फत शिक्षक भरती केल्यास प्रत्येकी रु.४१,८००/- इतके एकत्रित मानधन २०१४ चे शासन निर्णयाप्रमाणे द्यावे लागणार आहे. ही तफावत लक्षात घेता संस्थानवर अतिरिक्त आर्थिक बोजा पडणार आहे. यासंबधात विधी व न्याय विभाग यांचेकडून मार्गदर्शन मागविण्यात यावे. शैक्षणिक वर्ष सुरु झाले असल्यामुळे मागील वर्षीच्या ६ शिक्षक इच्छुक असल्यास त्यांना पूर्वीच्या दराने तात्पुरत्या स्वरुपात ११ महिने कालावधीकरीता मुदतवाढ देण्यात यावी. उर्वरीत शिक्षकांसाठी जाहिरात देऊन तात्पुरत्या स्वरुपात ११ महिने कालावधीकरीता भरती प्रक्रिया राबवावी.

(कार्यवाही-श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल)

---

**विषय नं.१२** दर्शन/आरती पासेसचे देणगी शुल्कात वाढ करणेबाबत.

**निर्णय क्र.३८६** एकुण किती पासेस उपलब्ध करण्यात येतात, त्यापैकी किती पासेसची विक्री होते व किती पासेस शिल्लक असतात, याचे तपशिलासह सविस्तर प्रस्ताव सादर करावा.

(कार्यवाही-जनसंपर्क विभाग)

---

**विषय नं.१३** श्रींचे व्दारकामाई येथील गाभारा पुर्वीप्रमाणे रात्रौ ९.३० वा. गेट बंद करणेस तसेच व्दारकामाई येथील सभामंडपात साईभक्तांना रात्रीचे वेळी प्रवेश देणेसाठी सभामंडप खुले ठेवणेस मान्यता मिळणेबाबत.

**निर्णय क्र.३८७** महामारीचा काळ संपल्यामुळे दि.२१.०६.२०२२ रोजी झालेला ठराव क्र.४०३ आता पुढे चालू ठेवण्याची गरज नाही. म्हणून सदर ठरावाची कार्य- अंमलबजावणी आता संपुष्टात आणण्यात येत आहे. प्रस्ताव मंजूर.

मात्र पुर्वी व्दारकामाईजवळ एका भाविकाने अनाधिकृत पणे खाजगी वाढदिवस केक कापून साजरा केल्याची घटना घडली अशा गोष्टी पुन्हा घडू नयेत यासाठी पुरेशी कडक सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात यावी व काही अनुचित प्रकार घडल्यास नेमणूकीस असलेल्या सुरक्षा रक्षकावर कडक कार्यवाही करण्याची तरतुद ठेवावी. (कार्यवाही-मंदिर विभाग / संरक्षण विभाग)

---

विषय नं.१४ संस्थानचे अग्निशमन वाहन पार्किंगकरीता पत्राशेड उभारणी करणे कामाचे ठेकेदार श्री.ऋषीकेश भरत सदाफळ, राहाता यांचे दुसरे व अंतिम देयक अदा करणेस मान्यता देणेबाबत.

निर्णय क्र.३८८ कामामध्ये बदल करण्यासाठी परवानगी घेतली नाही आणि कार्योत्तर परवानगी देखील घेतलेली नाही, म्हणून ठेकेदारास ठेक्याची रक्कम रु.१३ लाखामधुन आतापर्यंत दिलेली रक्कम रु.१०,८९,५६२/- वजा जाता उर्वरीत रक्कम अदा करण्यास परवानगी दिली.

(कार्यवाही-बांधकाम विभाग)

-------------------------------------------------------------------------------------------------------

विषय नं.१५ साई धर्मशाळा परिसरातील सर्व इमारतीचे आतील व बाहेरील बाजूने रंगकाम करणे व इमारतीचे संडास, बाथरुमचे नुतनीकरण करणे कामासाठी येणारे अपेक्षित रु.१४,३४,५२,५४६/- इतक्या अंदाजपत्रकीय खर्चास मान्यता देणेबाबत.

निर्णय क्र.३८९ प्रस्तावास तत्वत: मान्यता देण्यात येत आहे. मात्र मा.उच्च न्यायालयात सिव्हील अॅप्लीकेशन दाखल करण्यापुर्वी करावयाच्या कामाचे समितीसमोर सादरीकरण करावे.

(कार्यवाही-बांधकाम विभाग)

-------------------------------------------------------------------------------------------------------

विषय नं.१६ श्री साईबाबा समाधी मंदिर परिसरातील गुरुस्थान समोरील तळघरात स्ट्रॉंगरुमचे बांधकाम करणेसाठी रक्कम रु.६७,६२,०००/-मात्रचे अंदाजपत्रकीय खर्चास व विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.३९० तदर्थ समितीसमोर प्रस्तावीत स्ट्रॉंगरुमचे सादरीकरण करावे.

(कार्यवाही-बांधकाम विभाग)

-------------------------------------------------------------------------------------------------------

विषय नं.१७ शिर्डी नगरपंचायत हद्दीमधील पाण्याचा निचरा होण्यासाठी उपाय योजनेअंतर्गत विविध ठिकाणी आर.सी.सी. पाईपलाईनसाठी संस्थानकडून रु.११.१२ कोटी निधी मिळणेकामी शिर्डी नगरपंचायतीचे मागणीबाबत.

निर्णय क्र.३९१ सदरहु प्रस्तावीत काम हे महाराष्ट्र शासन व नगरपंचायत यांचेशी संबधीत आहे. सध्या प्रस्तावीत असलेल्या शिर्डी सुशोभिकरण योजनेमध्ये सदरील कामाचा समावेश करणेसंदर्भात महाराष्ट्र शासनाचे संबधीत विभागाशी पत्रव्यवहार करावा.

(कार्यवाही-बांधकाम विभाग)

-------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.१८** **सीसीटीव्ही यंत्रणा व लोकल दर्शन यंत्रणेचे मे.Escalates Tech India Pvt.Ltd. भोपाळ यांचे सादरीकरण (Presentation) करणेबाबत.**

**निर्णय क्र.३९२** **सादरीकरण करण्यात आले. त्यांनी सविस्तर प्रकल्प अहवाल सादर करावा. जेणे करुन प्राप्त प्रस्ताव शासनाच्या तज्ञ विभागाकडून तपासणी करुन घेता येईल.**

**(कार्यवाही-सीसीटीव्ही कंट्रोल सेल)**

---

**विषय नं.१९** **दि.२० एप्रिल, २०२२ रोजीचे सुधारीत शासन निर्णयानुसार वाहतुक भत्ता (T.A.) लागु करणेबाबत संस्थान कर्मचा-यांचा दि.३०.१२.२०२२ रोजीचा अर्ज.**

**निर्णय क्र.३९३** **माहिती अपुर्ण आहे. सविस्तर माहितीसह फेर प्रस्ताव सादर करावा.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.२०** **मेकॅनिकल विभागाकडील सहायक अभियंता हे पद कंत्राटी पध्दतीने कंत्राटदारामार्फत एकत्रित मानधनावर घेणेबाबत.**

**निर्णय क्र.३९४** **११ महिने कालावधीकरीता तात्पुरत्या स्वरुपात एकत्रित मानधनावर प्रशासनाने विहीत प्रक्रिया राबवून मेकॅनिकल विभागासाठी सहायक अभियंता घेण्यास परवानगी देण्यात येत आहे. सी.ए.दाखल करावा.**

**(कार्यवाही-मेकॅनिकल विभाग/ विधी विभाग)**

---

**विषय नं.२१** **सन २०२२-२३ या आर्थिक वर्षातील श्री साई प्रसादालयातील धान्य, कडधान्य व किराणा मालाचे घट-तुटीबाबतचा अवलोकनार्थ अहवाल.**

**निर्णय क्र.३९५** **नोंद घेतली.** **(कार्यवाही-श्री साई प्रसादालय)**

---

**विषय नं.२२** **श्री साई प्रसादालयातील माहे एप्रिल-२०२२ ते मार्च-२०२३ अखेर खाद्यतेल, वनस्पती तुप, शुध्द तुप व काजूचे रिकामे डब्यांचा अहवाल.**

**निर्णय क्र.३९६** **नोंद घेतली.** **(कार्यवाही-श्री साई प्रसादालय)**

---

**विषय नं.२३** **सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात लाडू प्रसाद बनविणेसाठी खर्च झालेल्या हरभरा डाळ व हिरवी विलायची या किराणा मालाच्या घटतुटीची नोंद घेणेबाबत.**

**निर्णय क्र.३९७** **नोंद घेतली.**

(कार्यवाही-लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग)

---

विषय नं.२४ माहे मार्च-२०२३ मध्ये दर्शन रांगेमध्ये साईभक्तांना ५० ग्रॅम वजनाचे बुंदी प्रसाद पाकिटे मोफत वाटपासाठी आलेल्या खर्चाची नोंद घेणेबाबत.

निर्णय क्र.३९८ नोंद घेतली.

(कार्यवाही-लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग)

---

विषय नं.२५ श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयामधील यांत्रिकीकरणासह स्वच्छतेचे कामकाज आऊटसोर्स पध्दतीने करुन घेणेकामी दैनिक वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.३९९ श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयामधील यांत्रिकीकरणासह स्वच्छतेचे कामकाज आऊटसोर्स पध्दतीने करुन घेणेकामी प्रति चौरस मिटर प्रमाणे ई-निविदा मागविण्यात याव्यात. त्याप्रमाणे सविस्तर प्रस्ताव सादर करावा. माहे जुलै-२०२३ पासून पुढे दोन महिने कालावधीसाठी अस्तित्वात असलेल्या ठेकेदारास आहे त्याच दरात मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

विषय नं.२६ श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील कायम कर्मचा-यांना गणवेशासाठी कापड+शिलाईसह तसेच डॉक्टर टेक्नीशियन यांना Apron व मेट्रन सिस्टर, ब्रदर यांना ड्रेस खरेदी करण्यासाठी कोटेशन मागविण्यास मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.४०० प्रस्ताव मान्य.

(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

विषय नं.२७ श्री साईबाबा हॉस्पिटलमधील दैनंदिन वापराने खराब झालेले लिनन नष्ट करुन त्याचा साठा रजिष्टरमधून निर्लेखित करणेबाबत.

निर्णय क्र.४०१ प्रस्ताव मान्य.

(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

विषय नं.२८ श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयातील वार्षिक सन २०२३-२४ करीता छपाई व कार्यालयीन स्टेशनरी खरेदी करणेबाबत.

**निर्णय क्र.४०२ प्रस्ताव मंजूर. खरेदी करतांना गरजेनुसार तिमाही खरेदी करावी.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.२९ श्री साईबाबा हॉस्पिटलमधील कॅथलॅब मशिन्सचे सन २०२३ ते २०२८ पाच वर्षाकरीता सर्व्हिस कॉन्ट्रक्ट देणेबाबत.**

**निर्णय क्र.४०३ प्रस्ताव मंजूर. वाटाघाटीसाठी बोलाविण्यात यावे. वाटाघाटी न केल्यास नव्याने निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी. मा.उच्च न्यायालयात सी.ए. दाखल करावा.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल/विधी विभाग)**

---

**विषय नं.३० संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीतांचा वैद्यकीय बिलाचा परतावा रक्कम रु.१३,३९,६२६/-मात्र अदा करणेस मंजूरी मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.४०४ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.३१ संस्थानचे दोन्ही रुग्णालयांकरीता नवीन अद्ययावत तंत्रज्ञान युक्त HIMS संगणकीय प्रणाली व PACS सिस्टीम खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र.४०५ नव्याने ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी. सी.ए.पुर्वी मंजूर झालेला आहे त्यामुळे पुन्हा सी.ए. दाखल करण्याची आवश्यकता नाही.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.३२ श्री साईनाथ रुग्णालयातील भुलतज्ञ डॉक्टरांना व्हिजीटींग भुलतज्ञांप्रमाणे त्यांचे डयुटी व्यतिरिक्त संध्याकाळी ६ नंतरच्या शस्त्रक्रिया व अतिरिक्त रुटीन/ तातडीच्या शस्त्रक्रियांच्या द्यावयाच्या मानधनाबाबत.**

**निर्णय क्र.४०६ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-श्री साईनाथ रुग्णालय)**

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा करण्यात आली.**

आयत्या वेळेचा

विषय नं.१ सन २०२३-२४ करीता श्री साई प्रसादालयातील प्रसाद भोजनामध्ये चपाती मशिनव्दारे चपाती तयार करणेकामी विविध वृत्तपत्रामध्ये जाहिरात देऊन फेर ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.४०७ विभागाने दिलेला खुलासा की, base price ठरवतांना आवश्यक मनुष्यबळ व किमान वेतन अधिनियमाप्रमाणे zone प्रमाणे परिगणना केलेली नसल्यामुळे चूक झाली आणि निविदा ४१% ने जास्त असल्यामुळे फेरनिविदा काढणे आवश्यक आहे, विचारात घेवून प्रस्ताव मान्य केला आहे. प्रस्तुतची निविदा प्रक्रिया रद्द करण्यात आली. नवीन योग्य प्रस्ताव सादर करण्यात यावा.

(कार्यवाही-श्री साई प्रसादालय)

---------------------------------------------------------------------------------------------------

आयत्या वेळेचा

विषय नं.२ प्रसादालय, लाडू निर्मिती, कॅन्टीन आणि मंदिर विभागासाठी सन २०२३-२४ वा वर्षाकरीता गहू, तांदुळ, साखर व हरभरा दाळ खरेदीकामी ई-निविदा प्राप्त न्युनतम दरधारकांना पुरवठा आदेश देणेबाबत.

निर्णय क्र.४०८ मागील वर्षाचे दर आणि या निविदा प्रक्रियेतील न्यूनतम दर आणि निविदा प्रक्रियेची जी माहिती दिली ती विचारात घेवून, मा. उच्च न्यायालयाने परवानगी दिली असल्यामुळे प्रस्तावाला मान्यता दिली.

(कार्यवाही-खरेदी विभाग)

---------------------------------------------------------------------------------------------------

आयत्या वेळेचा

विषय नं.३ कॅन्टीन विभागासाठी सन २०२३-२४ वा वर्षासाठी चहा पावडर व फिल्टर कॉफी खरेदीकामी वार्षिक ई-निविदा प्राप्त न्युनतम दरधारकांना पुरवठा आदेश देणेबाबत.

निर्णय क्र.४०९ तदर्थ समिती समोरील प्रस्तावाच्या ठरावाच्या तारखेचा उल्लेख करावा. मा. उच्च न्यायालयाच्या परवानगीच्या तारखेचा उल्लेख करावा. महाराष्ट्र शासन सुधारीत खरेदी नियमावलीतील तरतूद क्र. ३.१.२.८ चे अवलोकन केले. प्रस्ताव मान्य करण यात येत आहे.

(कार्यवाही-खरेदी विभाग)

---------------------------------------------------------------------------------------------------

आयत्या वेळेचा

विषय नं.४ संस्थानचे प्रसादालय, लाडू निर्मिती, कॅन्टीन व मंदिर विभागासाठी लॅमिनेटेड पेपर पिशवी खरेदीकामी ई-निविदा प्राप्त न्युनतम दरधारकांना न्युनतम दराने पुरवठा आदेश देणेबाबत.

निर्णय क्र.४१० तदर्थ समितीचा निर्णय क्र. २२/३/२०२३, मा. उच्च न्यायालयाची मान्यता दि.२८/०४/२०२३ आणि महाराष्ट्र शासन सुधारीत खरेदी नियमावलीतील तरतूद क्र.३.१.२.८ नुसार प्रस्तावाला मान्यता दिली.

(कार्यवाही-खरेदी विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.५ प्रसादालय, लाडू निर्मिती, कॅन्टीन व मंदिर विभागासाठी सन २०२३-२४ या वर्षासाठी मसाले खरेदीकामी वार्षिक ई-निविदा प्राप्त न्युनतम दरधारकांना पुरवठा आदेश देणेबाबत.

निर्णय क्र.४११ तदर्थ समितीच्या निर्णयाच्या तारखेचा उल्लेख करावा. मा. उच्च न्यायालयाने दि.२८/०४/२०२३ रोजी मान्यता दिली. या पार्श्वभूमिवर प्रस्तावाचे अवलोकन करुन मान्यता दिली.

(कार्यवाही-खरेदी विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.६ संस्थानचे प्रसादालय, लाडू निर्मिती, मंदिर व कॅन्टीन विभागासाठी सन २०२३-२४ वर्षासाठी किराणामाल, धान्य, कडधान्य, डाळी, ड्रायफ्रुटस, वनस्पती तुप व इतर वस्तु खरेदीकामी ई-निविदा प्राप्त न्युनतम दरधारकांना पुरवठा आदेश देणेबाबत.

निर्णय क्र.४१२ तदर्थ समितीच्या निर्णयाचा दिनांक, मा. उच्च न्यायालयाच्या मान्यतेचा दिनांक याचा उल्लेख करावा. महाराष्ट्र शासन सुधारीत खरेदी नियमावलीतील तरतूद क्र. ३.१.२.८ चा उल्लेख करावा. या सर्व गोष्टी विचारात घेवून प्रस्ताव ‘अ’, ‘क’, ‘ड’ यास मान्यता दिली. संपूर्ण निविदा प्रक्रिया विहित पध्दतीने राबवून या टप्प्यावर पोचल्यामुळे सदर खरेदी एकूण रक्कम १० लाख रुपयाचे आंत असल्यामुळे प्रस्ताव ‘ब’ ला देखील विशेष बाब म्हणून मान्यता दिली.

(कार्यवाही-खरेदी विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.७ प्रसादालय विभागासाठी सन २०२३-२४ या वर्षासाठी पत्रावळ खरेदीकामी वार्षिक ई-निविदा प्राप्त न्युनतम दरधारकांना पुरवठा आदेश देणेबाबत.

निर्णय क्र.४१३ तदर्थ समितीच्या निर्णयाच्या दिनांकाचा उल्लेख करावा. मा. उच्च न्यायालयाचा दि.२८/०४/२०२३ चा निर्णय आणि विभागाने राबविलेली निविदा प्रक्रिया विचारात घेवून प्रस्तावाला मान्यता दिली.

(कार्यवाही-खरेदी विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.८ प्रसादालय विभागासाठी सन २०२३-२४ या वर्षासाठी खाद्यतेल खरेदीकामी ई-निविदा प्राप्त न्युनतम दरधारकांना पुरवठा आदेश देणेबाबत.

निर्णय क्र.४१४ तदर्थ समितीच्या निर्णयाच्या दिनांकाचा उल्लेख करावा. मा. उच्च न्यायालयाचा दि.२८/०४/२०२३ चा निर्णय आणि विभागाने राबविलेली निविदा प्रक्रिया विचारात घेवून प्रस्तावाला मान्यता दिली.

(कार्यवाही-खरेदी विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.९ सन २०२३-२४ वर्षासाठी कॅन्टीन विभागाकरीता पॅकेज्ड ड्रिकींग वॉटर खरेदीकामी वार्षिक ई-निविदा प्राप्त न्युनतम दरधारकांना पुरवठा आदेश देणेबाबत.

निर्णय क्र.४१५ तदर्थ समितीच्या निर्णयाच्या दिनांकाचा उल्लेख करावा. मा. उच्च न्यायालयाचा दि.२८/०४/२०२३ चा निर्णय आणि विभागाने राबविलेली निविदा प्रक्रिया विचारात घेवून प्रस्तावाला मान्यता दिली. (कार्यवाही-खरेदी विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.१० सन २०२३-२४ वर्षासाठी कॅन्टीन विभागाकरीता टोन्ड गाय दूध खरेदीकामी वार्षिक ई-निविदा प्राप्त न्युनतम दरधारकांना पुरवठा आदेश देणेबाबत.

निर्णय क्र.४१६ तदर्थ समितीच्या निर्णयाच्या दिनांकाचा उल्लेख करावा. मा. उच्च न्यायालयाचा दि.२८/०४/२०२३ चा निर्णय आणि विभागाने राबविलेली निविदा प्रक्रिया विचारात घेवून प्रस्तावाला मान्यता दिली. (कार्यवाही-खरेदी विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.११ सन २०२३-२४ करीता मोतीचुर लाडू, सुटी बुंदी व बर्फी प्रसाद तयार करुन पॅकींग करुन देणेकामी मागविणेत आलेल्या ई-निविदांमधील न्युनतम दरधाराकासोबत चर्चा-वाटाघाटी करुन कार्यादेश देणेबाबत.

निर्णय क्र.४१७ सदरील निविदाधारकापैकी एक लाडू बनविणारे निविदाधारक ओम एंटरप्रायजेस, पुणे यांनी लेखी असमर्थता दर्शविली आहे. त्यामुळे नियमानुसार त्यांचेवर कारवाई करुन पुन्हा निविदा राबविण्यात यावी. तसेच एक लाडू वतीन लाडू बनविणेसाठी स्वतंत्र निविदा बोलविण्यात आलेल्या आहेत. मात्र लाडू बनविण्याची जागा एकच आहे. त यामुळे एक लाडू बनविण्याचे काम व तीन लाडू बनविण्याचे काम वेगवेगळया निविदाधारकांना देता नाही. म्हणून एक लाडू व तीन लाडूची निविदा रद्द करुन लाडू बनविण्याची एकच निविदा प्रक्रिया राबविण्याता यावी.

सुटी बुंदी बनविणेकामीचे निम्नतम निविदाधारक यांची निविदा मान्य करुन त्यांना कार्यादेश देण्याची परवानगी देण्यात आली.

(कार्यवाही-लाडू व बर्फी प्रसाद निर्मीती विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.१२ श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध मशिन्सचे सन २०२३-२४ करिता वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रक्ट करणेबाबत.

निर्णय क्र.४१८ तातडीची गरज लक्षात घेऊन सध्या ऑनकॉल बेसीसवर सेवा घेण्याची परवानगी पुढील विहीत प्रक्रिया पुर्ण होईपावेतो देण्यात येत आहे. सन २०२३-२४ वर्षासाठी नवीन निविदा प्रक्रिया नियमाप्रमाणे बोलविण्यात यावी. सी.ए.दाखल करुन परवानगी घेण्यात यावी.

(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.१३ श्री साईबाबा संस्थान रुग्णालयामध्ये खाजगी नर्सिंग स्कुल/ कॉलेजमधील प्रशिक्षण संस्थेतील विद्यार्थी यांना प्रात्यक्षीकासाठी दिलेली परवानगी रद्द करणेबाबत.

निर्णय क्र.४१९ संबधीत विषयासंबधीची मार्गदर्शक तत्व व शासन निर्णयासह प्रस्ताव पुन्हा सादर करावा.

(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.१४ संस्थान निधीतून शिर्डी नगरपंचायत हद्दीतील प्रथम प्राधान्य गटातील एकूण ११ रस्त्यांपैकी एलएक्यु/ एसआर/०७/२००७ या भुसंपादन प्रकरणातील जमीन मालक श्री.चांदमल झुंबरलाल लोढा यांनी कलम १८ खाली मे.राहाता न्यायालयातील भुसंदर्भक्र.३८/२०१२ दाखल केला होता. त्याचा निकाल दि.२९.०१.२०२१ रोजी पारित केला आहे. त्याच निकालाच्या आधारे दिलेल्या निर्णयाप्रमाणे श्री.कारभारी पाडूरंग गोंदकर व इतर १ यांना वाढीव नुकसान भरपाई रक्कम अदा करणेबाबत.

निर्णय क्र.४२० दि. २२/०३/२०२३ रोजी निर्णय क्र. २१५ प्रमाणे तदर्थ समितीने दिलेला आदेश आणि त्यानुसार विभागाने विधिज्ञाकडून दि. २२/०४/२०२३ रोजी घेतलेला अभिप्राय आणि एकूण देय असलेली रक्कम विचारात घेवून दि. २४/०१/२०२२ रोजी उप विभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांनी दिलेला निवाडा विचारात घेवून दि. १४/०३/२०२३ रोजी पूर्वीचे भूमिधारक यांनी पुढील व्याज सोडून देत असल्याच्या प्रस्तावाचा अर्ज दिला तो विचारात घेवून ती रक्कम कायद्याने त्यांना देय असल्यामुळे प्रस्तुतचा प्रस्ताव मंजूर केला.

(कार्यवाही-मालमत्ता विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.१५ साईआश्रम भक्तनिवासस्थान व साई धर्मशाळा विभागाकडील बेडशीट, उशी कव्हर धुणे व इस्त्री करणे, टॉवेल धुवून ड्रायर करणे, सोलापूर चादर धुणे, चादर (ब्लॅकेट) धुणे व गादीच्या खोळी धुणेकामी ई-निविदा प्रक्रिया राबवून नवीन कॉन्ट्रक्टरची नेमणूक होईपावेतो आहे त्याच मागील वर्षाचे दरात मुदतवाढ देणेबाबत.

निर्णय क्र.४२१ परिच्छेद क्र.१ ते ५ प्रमाणे मान्यता दिली.

(कार्यवाही- साईआश्रम भक्तनिवासस्थान)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.१६ सहाय्यक संपादक, साईलीला या पदाबाबत.

निर्णय क्र.४२२ प्रक्रिया पुर्ण करुन नवीन नेमणूक होईपर्यंत वर्तमान सहायक संपादक श्री. सुनिल दत्तात्रय राणे यांना सध्या त्यांना देत असलेल्या वेतनावर तात्पुरती नेमणूक करण्यासाठी मान्यता देण्यात येत आहे.

भरती प्रक्रिया नियमावलीला शासनाकडून अद्याप मंजूरीन मिळाल्यामुळे ११ महिने कालावधीकरीता कंत्राटी पध्दतीने प्रस्तावीत एकत्रित मानधन रु. ५३,२६८/- प्रतिमहा या वेतनावर नियुक्ती करण्यासाठीच्या प्रकियेला मान्यता दिली आहे. परंतु

थेट मुलाखतीच्याऐवजी अर्ज बोलावून घेण्यात यावे, मुलाखतीसाठी समिती गठीत करण्यात यावी, त्या समितीमध्ये तदर्थ समितीचे अध्यक्ष किंवा ते मनोनीत करतील ते सदस्य, मुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हा माहिती अधिकारी यांचा समावेश करण्यात यावा. (कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१७** **संस्थान कंत्राटी कर्मचारी व ठेकेदारामार्फत असलेले कंत्राटी कर्मचारी यांचे पाल्यांचा सन २०२२-२३ या वर्षाचा शैक्षणिक शुल्क परतावा देणेबाबत.**

**निर्णय क्र.४२३** प्रस्ताव मंजूर. (कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१८** **श्री.श्रीकांत भिमराव आहिरे, मदतनीस, संरक्षण विभाग यांना सेवानिलंबीत करणेबाबत.**

**निर्णय क्र.४२४** सदर कर्मचारी नियमित कामकाजासाठी विना परवानगी गैरहजर आहे. या व्यतिरिक्त विभागीय चौकशीमध्ये देखील सुचना दिल्यानंतरही नेमलेल्या तारखेला गैरहजर असल्याची माहिती दिली. त्यामुळे श्री.श्रीकांत आहिरे यांचे निलंबाचा प्रस्ताव मंजूर केला. (कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१९** **श्री.मनोहर उत्तम ताकवाले, सफाई कामगार, आरोग्य विभाग यांना सेवानिलंबीत करणेबाबत.**

**निर्णय क्र.४२५** विभागीय चौकशी सुरु केलेली नाही. सदरकर्मचारी सध्या कामवर हजर असल्यामुळे सेवानिलंबन करण्याची गरज नाही. प्रस्ताव नामंजूर.

(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२०** **श्री साईबाबा पुण्यतिथी (दसरा) उत्सवाचे वेळी निमंत्रण यादीमध्ये नावे समाविष्ठ करणेबाबत.**

**निर्णय क्र.४२६** या संदर्भात नियमावली नाही. तथापी या संदर्भात नियमावली तयार करणेसाठी प्रशासकीय स्तरावर समितीची स्थापना करण्यात आलेली आहे. या समितीने अहवाल

लवकरात लवकर तदर्थ समितीपुढे सादर करावा. त्यानंतर वरील विषयासंदर्भात निर्णय घेण्यात येईल. (कार्यवाही-मंदिर विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.२१ रथ/पालखी मिरवणूकीमध्ये सहभागी असणारे सेवेकरी यांना ओळखपत्र देणेबाबत.

निर्णय क्र.४२७ या संदर्भात नियमावली नाही. तथापी या संदर्भात नियमावली तयार करणेसाठी प्रशासकीय स्तरावर समितीची स्थापना करण्यात आलेली आहे. या समितीने अहवाल लवकरात लवकर तदर्थ समितीपुढे सादर करावा. त्यानंतर वरील विषयासंदर्भात निर्णय घेण्यात येईल. (कार्यवाही- मंदिर विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.२२ साईआश्रम, साईधर्मशाळा, व्दारावती या विभागातील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत प्लबींग, स्वच्छता इ. तसेच दुरुस्ती व देखभाल कामासंदर्भातील ई-निविदा बाबत.

निर्णय क्र.४२८ साईआश्रम, साईधर्मशाळा, व्दारावती या विभागातील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत प्लबींग, स्वच्छता इ. तसेच दुरुस्ती व देखभाल यासंदर्भातील ई-निविदेबाबत काही हरकती आलेल्या आहेत. कामगारांना देय असलेले किमान वेतन विचारात घेतल्यानंतर एल-१ चे दर किमान वेतनापेक्षा कमी आकारुन दिलेले आहेत. त्यामुळे ते दर मान्य करता येत नाही. म्हणून तीनही ठिकाणसाठी निविदा प्रक्रिया रद्द करण्यात यावी. नव्याने ई-निविदाप्रक्रियाा राबविण्यात यावी.त्यात कामाची जेवढी गरज तसेच प्रत्यक्ष भोगवटा आहे त्याप्रमाणे टप्पे पाडून नव्याने ई-निविदा बनवावी. सदरील ई-निविदा चक्रिय पध्दतीने मान्यतेसाठी पाठविण्यात यावी.

संस्थानमधील इतर विभागामध्ये अशाप्रकारचे कामासाठी वरील प्रमाणे ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी. (कार्यवाही- निवासस्थाने विभाग)

---

विषय नं.२३ श्री साईबाबा शताब्दी कॅन्सर हॉस्पिटल सुरु करणे व दोन्ही हॉस्पिटल विस्तारीकरण करणेबाबत.

निर्णय क्र.४२९ मा.अध्यक्ष यांचे पत्र समितीसमोर ठेवून चर्चा केली. त्यात उल्लेख केल्याप्रमाणे पुढील कार्यवाही करुन समितीसमोर आवश्यक प्रस्ताव सादर करावा.

(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

**विषय नं.२४** नित्य मुक्तानंद चॅरिटेबल ट्रस्ट यांचा साई ओम साई या म्युझिकल ट्रॅक बद्दलचे अर्जाबाबत.

**निर्णय क्र.४३०** या बाबतचा अहवाल समितीसमोर सादर करावा.

(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)

---

**विषय नं.२५** मा.अध्यक्ष महोदय यांना संस्थानचे कामासाठी स्विय सहायक देणेबाबत.

**निर्णय क्र.४३१** तदर्थ समितीचे अध्यक्ष तथा प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश यांचे स्विय सहायक दि.३१.०५.२०२३ रोजी सेवानिवृत्त होत असल्यामुळे समितीचा कामकाजामध्ये मा.अध्यक्ष असतांना मदत करण्यासाठी उपलब्ध राहणार नाही. त्यांना संस्थानचे कारभाराविषयी अनुभव आणि त्यांनी तदर्थ समितीला अध्यक्ष यांचे स्विय सहायक म्हणून केलेली अमुल्य सेवा विचारात घेऊन श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी अधिनियम-२००४ मधील कलम १३(४) नुसार प्रतिमहा दोन हजार रुपये मानधनावर तदर्थ समिती कार्यरत असे पर्यंत किंवा पुढील आदेशापर्यंत यापैकी जे आगोदर घडेल तो पर्यंत तदर्थ समितीचे अध्यक्ष तथा प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश यांचे स्विय सहायक म्हणून नेमण्याचा प्रस्ताव मा.अध्यक्ष यांनी आयत्या वेळेचा विषय म्हणून मांडला व तो सर्वानुमते मंजुर करण्यात आला.

(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)

---

**वरील निर्णय क्र.३७५ ते क्र.४३१ सर्वानुमते घेण्यात आले.**
**यानंतर सायं. ८.३० वा. सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.**

**(राहूल जाधव)**
**प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

**(सिध्दाराम सालीमठ,भा.प्र.से.)**
**जिल्हाधिकारी, अहमदनगर तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

**(सुधाकर यार्लगड्डा)**
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा**
**अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**